लोकमत पान क्र.10

(1)

# ‘टाडा’ खटल्यात भाई ठाकूरसह तिघे निर्दोष

## बिल्डर सुरेश दुबे खून खटला

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** विरार येथील बांधकाम व्यावसायिक सुरेश दुबे खून प्रकरणात जयेंद्र ऊर्फ भाई ठाकूर याच्यासह तिघांची निर्दोष मुक्तता करण्याचे आदेश विशेष न्यायाधीश एस. आर. नावंदर यांनी दिले. ‘टाडा’ कायद्यांतर्गत दाखल असलेल्या देशातील शेवटच्या खटल्याचा निकाल न्यायालयाने दिला. दुबे खून प्रकरणात १७ आरोपींना अटक करण्यात आली होती. या खटल्यात न्यायालयाने ६ आरोपींना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

जयंत ऊर्फ भाई विष्णू ठाकूर, दीपक ठाकूर, गजानन पाटील अशी निर्दोष मुक्तता करण्यात आलेल्यांची नावे आहेत. या खटल्यात नरेंद्र भालचंद्र भोईर, ज्ञानेश्वर पाटील, उल्हास राणे, पॅट्रिक तुस्कानो, राजा जाधव, माणिक पाटील यांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती.

बांधकाम व्यावसायिक सुरेश दुबे यांचा ९ ऑक्टोबर १९८९ रोजी नालासोपारा रेल्वे स्थानकावर पिस्तुलातून गोळ्या झाडून खून करण्यात आला होता. त्यावेळी या सर्व परिसरात भाई ठाकूर याची दहशत होती. या प्रकरणात पोलिसांनी टाडा (टेररिस्ट अँड डिस्ट्रप्टिव्ह ॲक्टव्हिज (प्रिव्हेन्शन) ॲक्ट) नुसार कारवाई केली होती.

### शेवटचा टाडा खटला

- देशातील या शेवटच्या टाडा खटल्याची सुनावणी २००५ मध्ये सुरू झाली होती.
- **सरकार पक्षाने ८० हून अधिक साक्षीदार तपासले. या प्रकरणात एकूण १७ आरोपी होते.**
- सध्या ५ आरोपींविरुद्ध सुनावणी सुरू होती. सुनावणीदरम्यान दोघांचे निधन झाले.
- **त्यात भाई ठाकूर, त्याचा भाऊ दीपक ठाकूर आणि गजानन पाटील हे तीन आरोपी होते.**

# भाई ठाकूरच्या साम्राज्याला सुरुंग लावणारा दुबे खून खटला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** ३४ वर्षांपूर्वी ९ ऑक्टोबर १९८९ रोजी नालासोपारा रेल्वेस्थानकावर पेपर वाचत बसलेल्या बिल्डर सुरेश दुबेवर सहा ते सात आरोपींनी गोळ्या झाडून हत्या केली होती. ज्या नागरिकांनी रेल्वे प्लॅटफॉर्मवरचा हा थरार पाहिला होता, ते आजही त्याविषयी दबक्या आवाजात बोलतात. या हत्याकांडामुळे भाई ठाकूर टोळीची दहशत समोर आली आणि देशभरात खळबळ उडाली. भाई ठाकूरच्या साम्राज्याला सुरुंग लावणारा म्हणून सुरेश दुबे खून खटला ओळखला जातो.

१९९०च्या दशकामध्ये वसई-विरार परिसरात भाई ठाकूर टोळीचा दबदबा होता. कोणाच्याही जागेवर अतिक्रमण करून जागा ताब्यात घेतल्या जात होत्या. याच काळात नालासोपारामध्ये दुबे कुटुंबीय स्थिरावले होते. दुबे कुटुंबातील मालकीची एक जागा ठाकूर टोळीने मागितली होती. त्याला सुरेश दुबे याने नकार दिला होता. खरे तर प्रकरण येथेच थांबले होते; परंतु एका बिल्डरने नकार दिला तर आपली नाचक्की होईल व दबदबा कमी होईल, अशी भीती भाई ठाकूर यांना वाटली होती. त्यामुळे भाई ठाकूर यांनी सुरेश दुबेला एकदा आपल्या कार्यालयात बोलावून दमदाटी केली व जागा सोडली नाही तर जीवे ठार मारण्याची धमकी दिली होती, अशी माहिती मिळत आहे.

या धमकीमुळे दुबे कुटुंबीय घाबरले. त्यांनी सुरेश दुबेला गावी जाण्यासाठी सांगितले. त्यामुळे सुरेश दुबे ९ ऑक्टोबरला गावी जाण्यासाठी सकाळी साडेदहा वाजण्याच्या सुमारास नालासोपारा रेल्वेस्थानकावर आला. गाडी येण्यास उशीर असल्यामुळे दुबे एक इंग्रजी पेपर वाचत बसला होते. दुसरीकडे आपली दहशत कायम ठेवण्यासाठी सुरेश दुबेला जाहीररीत्या मारण्याचा प्लॅन आखण्यात आला होता. त्यामुळे फलाट क्रमांक दोनवर सुरेश दुबेची गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. याप्रकरणी १९९२ साली यातील आरोपींना टाडा लावण्यात आला होता. त्यानंतर १७ आरोपींना अटक करण्यात आली होती.

### राज्यभरात उडाली खळबळ

- दुबे आणि त्याच्या कुटुंबीयांची गुन्हेगारी पार्श्वभूमी होती.
- **१९८९ मध्ये याप्रकरणी पोलिसांनी कोणतीही ठोस कारवाई केली नव्हती.**
- मात्र, १९९२ मध्ये याप्रकरणी गुन्हा दाखल करून घेतला गेला.
- **वसईचे आमदार हितेंद्र ठाकूर यांचे नाव या खून प्रकरणी घेण्यात आल्याने, संपूर्ण राज्यात खळबळ माजली.**
- आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यावरील कथित आरोपांमुळे हा खटला हाय प्रोफाइल म्हणून देशभरात गाजला होता.

लोकमत पु.पान क्र.1



# फोटो एकच, नावे वेगळी; १४१ सिमकार्डांची विक्री

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** एकच फोटो, मात्र नाव आणि पत्ते वेगवेगळे वापरून तब्बल १४१ सिमकार्ड विक्री केल्याप्रकरणी नवघर पोलिसांनी भाईंदर पूर्वेच्या दोन सिमकार्ड विक्रेत्यांवर गुन्हा दाखल केला आहे. बनावट फोटो व कागदपत्रांच्या आधारे ही सिमकार्ड वापरात आली आहेत.

केंद्र सरकारच्या दूरसंचार व दुरभाष्य संवाद विभागच्या वरिष्ठ उप महानिर्देशकांच्या साकीनाका कार्यालयातून बोलावणे आल्यावर मीरा भाईंदर-वसई-विरार पोलिस आयुक्तालयाच्या सायबर शाखेचे सहायक पोलिस उपनिरीक्षक संतोष चव्हाण हे १६ मे रोजीच्या बैठकीसाठी गेले होते. या कार्यालयाने सिमकार्ड विक्रीबाबत केलेल्या तपासणीत काही सिमकार्ड विक्रेत्यांनी एकाच फोटोचा वापर करून वेगवेगळ्या नावे व पत्ता असलेल्या कागदपत्राद्वारे सिमकार्ड चालू करून ती विक्री केली असल्याचे आढळल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आणून दिले. सायबर शाखेने नवघर पोलिस ठाण्यात २० मे रोजी भाईंदर पूर्वेचे रामदेव कलेक्शन व ओम मोबाइलवर गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पु. पान क्र.3

# खोपरा गावचा रस्ता शासनाच्या कोर्टात

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाईंदर पश्चिमेला डोंगरी-उत्तन भागातील खोपरा गावात जाण्याचा रस्ता विकसित करण्याचा प्रस्ताव अखेर फेरबदल करून महापालिकेने राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविला आहे.

डोंगरीच्या पोलिस चौकीकडून पुढे खोपरा गावाकडे जाणारा रस्ता हा विकास आराखड्यात असला, तरी तो काही भागांत डोंगरातून जातो. याशिवाय येथे मोठी लोकवस्ती नाही. पालिकेकडे निधीची कमतरता, मतदारांची नाममात्र संख्या, काही जमीन मालकांची, सीआरझेड आदी विविध कारणांनी हा रस्ता विकसित झाला नाही. त्यामुळे रहिवासी कच्च्या रस्त्याचाच वापर नाईलाजाने करत आले आहेत.

मंजूर विकास आराखड्यातील रस्ता हा डोंगरातून जात असल्याने, तो विकसित करण्यात अडथळे येत आहेत. त्यामुळे सध्या अस्तित्वात असलेला रस्ताच विकास आराखड्यात दाखवून तो विकसित करण्याचा निर्णय ठरावाद्वारे केला आहे. तो ठराव मंजुरीसाठी शासनाकडे सादर करूनही गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित होता. आमदार गीता जैन यांनी शासनाकडे रस्ता मंजूर करून विकसित करण्यासाठी पाठपुरावा सुरू केला होता.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात ऑक्टोबर महिन्यात झालेल्या बैठकीत रस्त्याच्या फेरबदलासाठी जागा मालकांची सुनावणी घेऊन, तसेच कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून प्रस्ताव पुन्हा शासनाकडे अंतिम मान्यतेसाठी सादर करावा, असे निर्देश महापालिकेला दिले होते.

CS CamScanner

(2)

लोकमत पान क्र.1



# संसद भवन उद्घाटनावर १९ विरोधी पक्षांचा बहिष्कार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नवी दिल्ली :** संसदेच्या नवीन इमारतीच्या उद्घाटन सोहळ्यावर काँग्रेससह १९ विरोधी पक्षांनी बहिष्काराचे अस्त्र उपसले आहे. बुधवारी या पक्षांनी संयुक्त निवेदनाद्वारे बहिष्काराची माहिती दिली. 'जेव्हा लोकशाहीचा आत्मा संसदेतून काढून घेण्यात आला, तेव्हा तेव्हा आम्हाला नवीन इमारतीची किंमत दिसत नाही,' अशी टीकाही विरोधी पक्षांनी केली. परंतु, संसद भवनाच्या उद्घाटनासाठी सर्व पक्षांना निमंत्रित केले आहे, या सोहळ्याला राजकारणाशी जोडू नका, असे गृहमंत्री अमित शाह यांनी स्पष्टपणे सांगितले.

काँग्रेस नेते राहुल गांधी आणि काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी यापूर्वीच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांच्या हस्ते उद्घाटनाची मागणी केली आहे. तसे न करून सर्वोच्च संवैधानिक पदाचा अपमान होत आहे. संसद ही अहंकाराच्या विटांनी बनलेली नसून, घटनात्मक मूल्यांनी बनलेली आहे, असे ट्वीट राहुल गांधी यांनी केले आहे. २८ मे रोजी पंतप्रधान मोदी नवीन इमारतीचे उद्घाटन करणार आहेत.

**या पक्षांनी टाकला बहिष्कार**

काँग्रेस, आम आदमी पार्टी, तृणमूल काँग्रेस, द्रविड मुन्नेत्र कळघम (द्रमुक), राष्ट्रीय जनता दल (आरजेडी), जनता दल-युनायटेड (जेडीयू), राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), भारतीय कम्युनिस्ट पक्ष, झारखंड मुक्ती मोर्चा, एआयएमआयएम, केरळ काँग्रेस मणी, विदुथलाई चिरुथाईगल कच्छी, राष्ट्रीय लोक दल, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, नॅशनल कॉन्फरन्स, रिव्होल्युशनरी सोशालिस्ट पार्टी, मारुमलार्ची द्रविड मुन्नेत्र कळघम (एमडीएमके).

लोकमत पू.पान क्र.4

# मीरा-भाईंदरमधील क्लस्टरमधून कोळीवाडे, गावठाण वगळले

## महापालिकेची माहिती : सुधारित नकाशांची नागरिकांची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** वाढत्या विरोधानंतर मीरा-भाईंदरमधील कोळीवाडे, गावठाण हे क्लस्टरमधून वगळले असल्याचे महापालिकेने प्रसिद्धी पत्रकाद्वारे जाहीर केले आहे. तर मच्छीमार नेत्यांनी पालिकेच्या भूमिकेचे स्वागत केले असले तरी कोळीवाडे व गावठाण वगळल्याचे नकाशे प्रसिद्ध करावेत, अशी मागणी केली आहे.

मीरा-भाईंदर महापालिकेने शहरात २४ ठिकाणी क्लस्टर योजनेचे नकाशे मंजूर करून तशी योजना जाहीर केली आहे. योजनेचे नकाशे प्रसिद्ध झाल्यानंतर त्यात कोळीवाडे व गावठाणचा समावेशही केला गेल्याने उत्तन भागातून स्थानिक ग्रामस्थांसह मच्छीमार व मच्छीमार नेत्यांनी क्लस्टरचा विरोध सुरू केला. तर खासदार राजन विचारे, आमदार प्रताप सरनाईक व गीता जैन यांनीही कोळीवाडे व गावठाण क्षेत्र स्थानिक ग्रामस्थ आणि मच्छीमारांचा विचार करून क्लस्टरमधून वगळण्याची मागणी चालवली होती. खा. विचारे यांनी शिष्टमंडळासह आयुक्त दिलीप ढोले यांची भेट घेऊन क्लस्टर योजनेतून कोळीवाडे व गावठाण वगळण्याचा आग्रह धरला होता.

उत्तनमधील मच्छीमारांचे कोळीवाडे, मासळी सुकवण्याच्या जागा, शेतकऱ्यांच्या शेतजमिनी आदींवर क्लस्टर योजना राबवून किनारे बिल्डरांसाठी खुले करण्याचा घाट असल्याचा आरोप मच्छीमारांनी केला होता. आयुक्त दिलीप ढोले यांनीही मच्छीमार व ग्रामस्थांसह लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या मुद्द्यांवर महापालिकेची भूमिका स्पष्ट करून क्लस्टरमधून गावठाण व कोळीवाडे वगळल्याचे प्रसिद्धीपत्रकाद्वारे जाहीर केले आहे. आयुक्तांच्या भूमिकेचे मच्छीमार व ग्रामस्थांनी स्वागत करून कोळीवाडे व गावठाण क्लस्टरच्या प्रसिद्ध नकाशात समाविष्ट असून ते वगळून सुधारित नकाशे पालिकेने प्रसिद्ध करावेत, अशी मागणी आहे.



### क्लस्टरच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र कक्ष

- मीरा-भाईंदर महापालिका आयुक्त दिलीप ढोले यांनी क्लस्टरच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मीरा रोडच्या पालिका बौद्ध विहार इमारतीत स्वतंत्र कक्ष सुरू केला आहे. योजनेसाठी नेमण्यात आलेले सल्लागार, अभियंते आदी या कक्षातून कामकाज करतील.
- महापालिकेने तयार केलेल्या आराखड्यातील इमारती, चाळी व झोपड्यांची माहिती, घराचे क्षेत्रफळ, रहिवाशांची यादी, रहिवाशांची बायोमेट्रिक नोंदणी आदी एकात्मिक सर्वेक्षण दरम्यान केली जाणार आहेत. सर्वेक्षणासाठी सरकारने महापालिकेला दहा कोटींचा निधी दिला आहे.

पुण्यनगरी पू.पान क्र.1

# मुख्य मार्गावरील खड्ड्यांमुळे वाहनचालकांना धोका

**। मीरा रोड ।** मीरा-भाईंदर शहरात जाण्यासाठी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज या मुख्य रस्त्यावर गेल्या काही वर्षांपासून मेट्रोचे काम सुरू आहे. त्यामुळे या रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत तर काही ठिकाणी गटारांची झाकणे रस्त्यापेक्षा खाली गेली आहेत. त्या रस्त्यात गटाराच्या झाकणाच्या ठिकाणी खड्डे पडले आहेत. या खड्ड्यामध्ये दुचाकी आपटून अपघात होत आहेत. चारचाकी गाडी देखील आपटत आहे. छत्रपती शिवाजी महाराज मुख्य मार्गावरील रस्त्यात पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहन चालकांचा जीव धोक्यात आला आहे. याकडे महापालिका तसेच एमएमआरडीए देखील दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.

मीरा-भाईंदर येथे दहिसर ते भाईंदर पश्चिम या ठिकाणी मेट्रोचे काम सुरू आहे. ज्या रस्त्यावर मेट्रोचे काम सुरू आहे, त्या रस्त्याची एमएमआरडीए व मेट्रो ठेकेदार देखभाल, दुरुस्ती करणार आहेत. दोन वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराज हा मुख्य मार्ग जवळपास २३ कोटी रुपये खर्च करून बनवण्यात आला. हा रस्ता बनवताना निकृष्ट दर्जाचा बनवण्यात आला. याबाबत अनेकांनी एमएमआरडीएकडे तक्रारी देखील केल्या होत्या, परंतु राजकीय दबावापोटी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

CamScanner

पुढारी पु.पान क्र.3

(3)

# वसई विरारच्या समस्यांबाबत काँग्रेस आक्रमक

## १ जून रोजी पालिका मुख्यालयावर मोर्चा

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

वसई -विरार शहर महानगरपालीका स्थापन होऊन, लवकरच १४ वर्षे पूर्ण होत आहेत. मात्र तरीही पिण्याचे पाणी, रस्ते, आरोग्य, शिक्षण या महत्वाच्या विषयांवर महानगरपालिकेकडून उदासिनता तर आहेच परंतु वाढत्या लोकसंख्येमुळे नव्याने निर्माण झालेले बुडणारी वसई, प्रदूषण, सांडपाणी व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन आणि वाढत्या नागरीकरणामुळे वसई विरारचे कोलमडलेले नियोजन हे प्रश्न गंभीर स्वरूप घेत आहेत.

मागील अनेक वर्षापासून नागरीकांच्या समस्या घेवून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागाचे प्रदेशाध्यक्ष आणि माजी जिल्हा परिषद सदस्य समीर वर्तक सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. परंतु समस्यांचे निराकरण होत नसल्याचा आरोप करून वर्तक यांनी आता पुन्हा आंदोलनाचा निर्णय घेतेला आहे. नागरिकांचे महत्वाचे पुढील प्रश्न घेवून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या पर्यावरण विभागातर्फे गुरुवार दिनांक १ जुन २०२३ रोजी सकाळी १०.०० वाजता वसई विरार शहर महानगरपालीकेच्या मुख्यालयावर खालील प्रलंबित विषयांसाठी धडक मोर्चा काढण्यात येणार आहे.

२००८ पासून सुरू झालेली ६९ गावांची पिण्याच्या पाण्याची योजना पूर्ण का होत नाही? आम्हाला महानगरपालीका पाणी का देत नाही?, दिवाणमान येथील सर्व्हे नं. १७६, आणि १७७ मधील सर्वधर्मिय दफनभूमी तात्काळ सुरू करावी. महानगरपालीका क्षेत्रातील सर्वधर्मिय लोकसंख्येनुसार स्मशानभूमी, दफनभूमीचे निर्माण करावे, महानगरपालीकेची परिवहन सेवा २४ तास असावी अन्यथा आमची एस. टी. महामंडळाची बससेवा चालू करा., महानगरपालीका खखढ आणि छएएठख च्या अहवालाप्रमाणे नियोजन करणे तसेच होल्डींग पॉन्ड्स (धारण तलाव) बांधून, मोठे गटारे बांधून अनधिकृतपणे बंद केलेले नैसर्गिक पाण्याचा निचरा होण्याचे सर्व मार्ग मोकळे करणे अशा अनेक मागण्या आहेत. अनेक समस्यांसाठी काँग्रेसच्या पर्यावरण विभागाचा धडक मोर्चा असून हि सर्व कामे जनतेने निदर्शनास आणून देणे म्हणजे महानगरपालीका प्रशासनासाठी शरमेची बाब आहे. हे नागरीकांचे प्रश्न त्वरीत सुटावे म्हणून धडक मोर्चा आहे.

# इंटरनेट डिव्हाईसची चोरी प्रकरणी गुन्हा दाखल

**मिरारोड :** भाईंदर पूर्वेच्या सुजाता शॉपिंग सेंटर येथे असलेल्या काही इमारतीचे इंटरनेट डिव्हाईसची चोरी केल्याची घटना घडली आहे. डिव्हाईसची चोरी केल्याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमा विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाईंदर पूर्वेच्या नवघर रोड परिसरातील सुजाता शापिंग सेंटर व मयुरपंख सोसायटी येथून इंटरनेट चालकाला इंटरनेट बंद झाल्याचा फोन आला. त्यावेळी त्यांनी नेट कशामुळे बंद झाले हे पाहण्यासाठी दोन जणांना पाठवले. ते इमारतीत गेले असता तेथे इंटरनेटचा डिव्हाईस दिसून येत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनतर इतर ठिकाणी देखील डिव्हाईसची चोरी झाल्याचे समजले. डिव्हाईसची चोरीला गेलेल्या इमारतीमधील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता सीसीटीमध्ये एक इसम डिव्हाईस काढताना दिसून आल्याने गुन्हा दाखल केला आहे.

पुढारी पान क्र.7

# अनधिकृत पार्किंगमुळे कोंडी

**नालासोपारा : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गाला जोडणाऱ्या मधुबन ते सातीवली या रस्त्यावर रस्त्याच्या कडेला मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाहन पार्किंग करण्यात येत आहे. त्यामुळे वाहतूककोंडी होत असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

या रस्त्यावर अनेक मोठे ट्रान्सपोर्ट आहेत. हे ट्रान्सपोर्ट व्यावसायिक रस्त्यावरील वाहतूक कोंडीची कुठलीही तमा न बाळगता सर्रासपणे मोठे १० चाकी वाहने रस्त्यावर लावून वाहतूक विस्कळीत करतात. त्यातच प्रामुख्याने रेंज ऑफिस ते भोईदापाडा आणि या ठिकाणी मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वाहने उभी करण्यात येत आहेत. ही वाहने रस्त्यावर कुठल्याही पद्धतीने उभी करण्यात येत असल्याने दिवसेंदिवस वाहतूक कोंडी वाढत असून दैनंदिन सकाळी आणि संध्याकाळी मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे नागरिकांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असून आता बेकायदेशीररित्या रस्त्यावर अवाढव्य स्वरूपाची वाहने उभी करणाऱ्या या वाहनांवर आणि ट्रान्सपोर्ट व्यावसायिकांवर कारवाई करण्याची मागणी युवासेनेचे अतुल काकासाहेब मोटे यांनी वाहतूक विभागाचे पोलिस निरीक्षक सागर इंगोले यांनी भेट घेऊन केली आहे. वसई पूर्व परिसर हा औद्योगिक वसाहतीने घेरला असल्याने संध्याकाळच्या सुमारास मोठ्या प्रमाणात वाहनांची आणि नागरिकांची वर्दळ असते.

पुढारी पान क्र.9

# अटक टाळण्यासाठी आरोपीचा शस्त्राने हल्ला

**मिरारोड : पुढारी वृत्तसेवा**

अटक टाळण्यासाठी घरफोडी करणाऱ्या सराईत आरोपीने मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण पथकावर धारदार शस्त्राने हल्ला केला. या हल्ल्यात हातावर वार झाल्याने हवालदार अनिल नागरे हे जखमी झाला. या थरारक प्रसंगादरम्यान पोलिसांनी आरोपी असता शारुक यासिन सरदार याला १२.५ इंच लांबीचा सुरा जप्त केला. हा आरोपी पोलिसांच्या हाती लागल्याने ५ गुन्हे उघडकीस आले.

वालीव पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल असलेल्या आरोपीचा तपास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण पथकाकडून तपास करत असताना त्या गुन्हयातील संशयीत आरोपी हा चोरी केलेला मोबाईल फोन विक्री करण्यासाठी गौराई पाडा, जीवन नगर नाका येथे येणार असल्याची माहिती मिळाली. पोलीस पथकाने त्या ठिकाणी सापळा लावला असता शारुक यासिन सरदार ( २२ ) हा तेथे आला. त्यास ताब्यात घेण्यासाठी पोलीस त्याच्या जवळ जाताच त्याने त्याच्या जवळील धारदार शस्त्राने पोलीसांवर हल्ला करून पोलीस हवालदार अनिल नागरे यांच्या हाताला दुखापत केली, तरी देखील पोलीसांनी मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता गुन्हयात चोरी केलेले ८१ हजार रुपयांचे ९ मोबाईल व एक लोखंडी धारदार सुरा असा मुद्देमाल जप्त केला. आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

CamScanner

सकाळ पृ. पान क्र. १

# वसईत महिन्याभरात १८ गायी बेपत्ता

## तबेला मालकांमध्ये भीतीचे वातावरण

नालासोपारा, ता. २४ (बातमीदार) : वसई, नायगाव परिसरात चरायला सोडलेल्या, तसेच तबेल्यात बांधलेल्या गायी चोरीला जात आहेत. गेल्या महिन्याभरात १८ गायी बेपत्ता झाल्या आहेत. नेमक्या गायींच कोणत्या कारणाने बेपत्ता होत आहेत, त्यांचा वापर चोर कशासाठी करत असतील, याबाबत तालुक्यात उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे.

मौजे टिवरी येथील लक्ष्मणकुमार विश्वकर्मा यांच्या तबेल्यात १० गाय, प्रत्येकी एक बैल आणि म्हैस, तसेच दोन वासरू आहेत. १४ एप्रिल २०२३ रोजी त्यांनी सर्व जनावरे चरण्यासाठी सोडली होती. सायंकाळी जनावरे आणण्यासाठी ते गेले असता सात गायी, एक बैल बेपत्ता झाल्याचे निदर्शनास आले. शोधमोहिमेनंतर त्यांनी २८ एप्रिल रोजी नायगाव पोलिसांत तक्रार दाखल केली; पण अद्याप कारवाई झाली नाही. २८ एप्रिलला राजीवलीतील तबेल्यातून सहा गायी; २ मे रोजी नायगावमधील तबेल्यातून सहा गायी, दोन म्हैस गायब झाल्याचे त्यांनी सांगितले.

> तालुक्यातून गायी चोरीला जात असल्याची तक्रार आपल्यापर्यंत अद्याप आलेली नाही. संबंधित पोलिस ठाण्यातून माहिती घेऊन या प्रकरणी सखोल तपास करण्यात येईल.
> - **पौर्णिमा चौगुले**, पोलिस उपायुक्त

लोकसत्ता पृ. पान क्र. ४

# बांधकामावर कारवाई; पालिका कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकाने चुकून दुसऱ्या गाळ्यावर कारवाई केल्याने गोंधळ निर्माण झाला. यावेळी गाळा मालकाने पालिकेच्या पथकाला शिवीगाळ आणि धक्काबुक्की केली. या प्रकरणी तुळींज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

नालासोपारा पूर्वेतील प्रगतीनगर येथील श्रीजी अपार्टमेंटमध्ये पाच अनधिकृत गाळ्यांवर मंगळवारी सकाळी ११.३० च्या सुमारास पालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून कारवाई करण्यात आली. यावेळी इमारतीमधील गाळा क्रमांक पाचचे तोडकाम करत असताना चुकून गाळा क्रमांक सहाचे कारवाईत नुकसान झाले होते. यावेळी पालिकेचे वरिष्ठ लिपिक हेमंत ठाकरे यांनी पालिकेकडून नुकसान भरपाई दिली जाईल, असे सांगून समजूत काढली. मात्र तरीही दोन आरोपींनी त्यांना धक्काबुक्की केली.

सकाळ पान क्र. ५

# गौतमी पाटील आज विरारमध्ये

नालासोपारा, ता. २४ (बातमीदार) : महाराष्ट्रात सध्या गाजत असणारी नृत्यांगना गौतमी पाटील ही पहिल्यांदाच गुरुवारी (ता. २५) विरारमध्ये येणार आहे. विरार पूर्व खार्डी येथील प्रभाकर पाटील यांच्या घरातील सत्यनारायणाच्या पूजेनिमित्त गौतमी पाटील यांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. खार्डी गावातील कोसमाई मंदिराच्या मैदानात रात्री ७ वाजता गौतमी पाटील यांचा कार्यक्रम आहे. पालघर जिल्ह्यात गौतमी पाटील पहिल्यांदाच येत असल्याने जिल्ह्यातील हजारो नागरिक या कार्यक्रमात सहभागी होण्याची शक्यता आहे. या कार्यक्रमात सुरक्षा रक्षक सज्ज ठेवून, पोलिस प्रशासनाचीही मदत घेतली आहे.

लोकसत्ता पान क्र. १

## सातव्या वेतन आयोगाची थकबाकी

# राज्य कर्मचाऱ्यांना जूनच्या वेतनाबरोबर चौथा हप्ता

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**



**मुंबई :** राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाच्या फरकाच्या थकबाकीचा चौथा हप्ता जूनच्या वेतनाबरोबर देण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना थकबाकीची रक्कम रोखीने मिळणार आहे.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना १ जानेवारी २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी जानेवारी २०१९ पासून करण्यात आली. त्यानुसार गेल्या तीन वर्षांतील थकबाकीची रक्कम पुढील पाच वर्षांत पाच समान हप्त्यांत देण्याचा निर्णय घेण्यात आला. पहिले दोन हप्ते देण्यात आले. मार्च २०२० मध्ये करोना साथीने आर्थिक चित्र बदलले. राज्यासह देशात टाळेबंदी करावी लागली. त्याचा प्रतिकूल परिणाम राज्याच्या अर्थव्यवस्थेवर झाला. त्यामुळे हे हप्ते लांबणीवर गेले. नंतर तिसरा हप्ता देण्यात आला होता. आता थकबाकीचा चौथा हप्ता देण्यात येणार आहे. राज्यातील शासकीय, जिल्हा परिषद, शासन अनुदानित शाळा व इतर अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांना जून २०२३ च्या वेतनाबरोबर थकबाकीचा हप्ता देण्याचा आदेश वित्त विभागाने बुधवारी काढला.

**करोनामुळे विलंब** सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम पाच समान हप्त्यांत देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, दोन हप्ते दिल्यानंतर करोनामुळे पुढील हप्ते देण्यात खंड पडला. करोनाची साथ नियंत्रणात आल्यानंतर आणि अर्थव्यवस्था पुन्हा रुळावर आल्यानंतर जून २०२२ मध्ये कर्मचाऱ्यांना थकबाकीचा तिसरा हप्ता देण्यात आला. आता चौथा हप्ता देण्यात येणार आहे.

CamScanner

लोकसत्ता पु.पान क्र.१



# वसईमधील कांदळवने धोक्यात

## कत्तल करणाऱ्यांविरोधात कारवाईसाठी लवकरच पाहणी

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई** : वसई-विरारच्या खाडीकिनाऱ्यांवर असलेल्या कांदळवनांची कत्तल, त्यावर माती भराव, अतिक्रमण असे प्रकार सुरू असल्याने वसईतील कांदळवने धोक्यात आली आहेत. महसूल विभागाकडून कांदळवनांची पाहणी केली जाणार आहे. त्यात कांदळवन क्षेत्रात अतिक्रमण तसेच कत्तल केल्याचे आढळल्यास दोषींविरोधात अहवाल तयार करून कारवाई केली जाणार आहे.

वसई-विरारमध्ये विविध ठिकाणच्या खाडीकिनारी मोठ्या प्रमाणात कांदळवन क्षेत्र आहे; परंतु हळूहळू हे क्षेत्र विविध कारणांमुळे कमी होऊ लागले आहे. समुद्रकिनाऱ्यावरील पाण्याचा प्रवाह रोखणे, जमिनीची होणारी धूप थांबविणे, सुनामी, चक्रीवादळ आणि पुरापासून संरक्षण करणे, समुद्राचे प्रदूषण कमी करणे, यासाठी कांदळवने उपयोगी ठरत आहेत. त्यामुळे त्यांचे संवर्धन होणे गरजेचे आहे. मात्र, वसई-विरारमध्ये खाडीकिनारी कांदळवनांच्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात मातीचा भराव येत आहेत. अनेक ठिकाणी करून त्यावर बांधकामे करण्यात कांदळवनांची कत्तल (पान ४ वर)



### २०१६ ते २०१९ दरम्यान अवघे नऊ गुन्हे

मागील दोन ते तीन वर्षांत कांदळवनांची कत्तल व अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले आहे. २०१६ ते २०१९ या कालावधीत भुईगाव, उमेळे, रानगाव, आगाशी, मालोंडे, ससूनवघर या भागात कांदळवन अतिक्रमण व कत्तलप्रकरणी नऊ गुन्हे दाखल करण्यात आले होते. मात्र त्यानंतर एकही कारवाई न झाल्याने वसई-विरार भागात कांदळवनांची कत्तल होत असून विकासाच्या नावाखाली त्यांचा ऱ्हास होत आहे.

### कांदळवनांचे संवर्धन गरजेचे

पर्यावरणाच्या व किनारपट्टीच्या दृष्टीने कांदळवने महत्त्वाची आहेत. वसईतील किनारपट्टी व खाडीच्या भागात मोठ्या प्रमाणात कांदळवने आहेत; परंतु त्यावर होणारे अतिक्रमण व कत्तल यामुळे कांदळवने धोक्यात आली आहेत. या कांदळवनांचे संवर्धन करण्याची गरज आहे.

## वसईतील कांदळवने धोक्यात

(पान १ वरून) केली जात आहे. त्यामुळे कांदळवने नष्ट होऊ लागली आहेत.

कांदळवन क्षेत्रातील अतिक्रमणांच्या संदर्भात वसईच्या महसूल विभागाकडेही तक्रारी येत आहेत. त्यामुळे महसूल विभाग व कांदळवन विभागामधील अधिकाऱ्यांकडून कांदळवन असलेल्या क्षेत्रांची पाहणी करण्यात येणार आहे, अशी माहिती महसूल विभागाच्या अधिकाऱ्याने दिली. कांदळवन क्षेत्रात जेथे अतिक्रमण किंवा कत्तल केल्याचे निदर्शनास येईल, त्याचा अहवाल तयार करून कारवाई केली जाणार आहे, असे वसईच्या तहसीलदार कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे.

# रस्त्यावर वाहने विकणाऱ्यांवर गुन्हे

लोकसत्ता प्रतिनिधी

**वसई** : जुन्या वाहनांची खरेदी-विक्री करणारे व्यावसायिक थेट रस्त्यावरच वाहने विक्रीसाठी ठेवत आहेत. त्यामुळे ये- जा करण्याच्या मार्गात अडथळे निर्माण होत असल्याने त्यांच्याविरोधात वाहतूक विभागाने मोहीम हाती घेतली आहे. आतापर्यंत ११ ठिकाणी कारवाई करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आली आहे.

> **रस्त्यावर मोटारींचा बाजार भरवल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याची बाब निदर्शनास आली होती. त्यामुळे अशा पद्धतीने वाहनांची विक्री करणाऱ्या विक्रेत्यांविरोधात कारवाई सुरू केली आहे.** - सागर इंगोले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाहतूक परिमंडळ २

वसई-विरार शहरातील विविध भागांमध्ये जुन्या वाहनांची खरेदी-विक्री करण्यासाठी व्यावसायिकांनी आपली दुकाने थाटली आहेत. विशेषतः पंचवटी, वसंत नगरी परिसर, नालासोपारा यासह इतर ठिकाणी अशी दुकाने आहेत. मात्र, या व्यावसायिकांकडून पदपथावर व मुख्य रस्त्यातच चारचाकी वाहने उभी केली जात आहेत. काही ठिकाणी मुख्य रस्त्याची एक लेन विक्रीसाठी ठेवलेल्या मोटारींनी व्यापलेली असते. आधीच शहरातील वाढती वाहनांची संख्या व अपुरे रस्ते, यामुळे वाहतुकीवर त्याचा परिणाम होत आहे. त्यामुळे रस्त्यावर मोटारींचा बाजार मांडून वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या विक्रेत्यांच्या विरोधात वाहतूक विभागाने कारवाई सुरू केली आहे. त्यात आतापर्यंत ११ ठिकाणी कारवाई करण्यात आली असून कलम २८३ प्रमाणे गुन्हे दाखल केल्याची माहिती वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सागर इंगोले यांनी दिली आहे.

# बालविवाहप्रकरणी पाच जणांवर गुन्हा

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई** : भाईंदरमध्ये १५ वर्षीय मुलीचा विवाह केल्याचे प्रकरण उघडकीस आले आहे. याप्रकरणी उत्तन सागरी पोलिसांनी पाच जणांच्या विरोधात बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ च्या कलम ९,१०,११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास उत्तन येथील शंकर मंदिर चौकाजवळ हे लग्न लावण्यात आले होते. याप्रकरणी मुलीचे आई-वडील यांच्यासह तिघा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले.

CamScanner

(6)

लोकसत्ता पृ. पान क्र.५



मेट्रोच्या कामामुळे दहिसर टोल नाक्याजवळ वाहतूक कोंडी होत आहे.

# दहिसर टोल नाक्यावरील कोंडीत मेट्रोच्या कामाची भर

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** दहिसर टोल नाक्यामुळे काशिमीरा परिसरात होत असलेल्या वाहतूक कोंडीच्या समस्येत मेट्रोच्या कामाची भर पडली आहे. दुसरीकडे रस्त्याचे काम सुरू असल्याने वाहतूक कोंडीची समस्या अधिकच गंभीर झाली आहे.

दहिसर टोल नाक्यावर नेहमी वाहतूक कोंडी होते. ही समस्या दूर करण्यासाठी या भागाला मेट्रोने जोडण्याचा प्रकल्प आखण्यात आला आहे. त्यानुसार गेल्या तीन वर्षांपासून या मेट्रो प्रकल्पाचे काम सुरू आहे. या कामासाठी या मार्गावर असलेली वळणे व जोड रस्ते बंद करण्यात आली आहे. त्यात रस्त्याच्या डाव्या बाजूला असलेल्या सेवा रस्त्यावर अन्य कामांसाठी खोदकाम सुरू आहे. त्यामुळे वाहतूक कोंडीत प्रचंड वाढ झाली असल्याचे दिसून येत आहे. या मार्गांवरून प्रवास करताना प्रवाशांना बराच काळ ताटकळत राहावे लागत आहे. यामुळे वेळ आणि इंधन वाया जात असून प्रदूषणातदेखील वाढ होत आहे. त्यामुळे शासनाने एकावेळी एकच काम करून हा मार्ग सुरळीत कसा ठेवता येईल, याकडे लक्ष द्यावे, अशी मागणी वाहनचालकांनी केली आहे.

राष्ट्रीय महामार्गावर मेट्रोच्या कामामुळे तसेच दहिसर टोल नाक्यामुळे वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. याचा परिणाम मीरा-भाईंदर शहरातील अंतर्गत वाहतुकीवरही होऊ लागला आहे. त्यामुळे शहरातील रस्ते सुरू करण्याच्या विचार सुरू असल्याचे पोलीस उपायुक्त जयवंत बजबळे यांनी सांगितले.

# खानिवडे येथे रासायनिक कचऱ्याला आग

**वसई :** महामार्गावर खानिवडे येथे तानसा नदीजवळ फेकण्यात आलेल्या रासायनिक कचऱ्याला आग लावण्याचा प्रकार घडला आहे. या आगीच्या धुरामुळे आजूबाजूच्या परिसरातील नागरिक हैराण झाले.

वसई पूर्वेच्या भागातून मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्ग गेला आहे. या महामार्गालगत विविध प्रकारच्या टाकाऊ कचऱ्यासह इतर रासायनिक कचराही आणून टाकला जात आहे. काही वेळा हा कचरा पेटवण्याचे प्रकार घडतात. खानिवडे येथील तानसा नदीजवळ टाकलेल्या रासायनिक कचऱ्याला नुकतीच आग लावण्यात आली होती. या आगीमुळे सर्वत्र धूर पसरला होता. या अशा प्रकारे कचरा टाकून प्रदूषण करणाऱ्यांविरोधात कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

लोकसत्ता पृ. पान क्र.१

# 'रील'प्रकरणी तरुणावर गुन्हा

**वसई :** वसईच्या ऐतिहासिक किल्ल्यात 'इन्स्टाग्राम'वर रील बनवताना प्राचीन वास्तूची विटंबना करणाऱ्या तरुणावर अखेर वसई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुरातत्त्व विभागाने दिलेल्या तक्रारीनंतर हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वसई पश्चिमेत ऐतिहासिक वसईचा किल्ला आहे. या किल्ल्याला विविध ठिकाणचे नागरिक व पर्यटक भेट देतात. एका तरुणाने 'इन्स्टाग्राम'वर रील बनविण्यासाठी नुकतेच फ्रानसिसकन चर्चमधील एका शिलालेखावर आग लावून विटंबना केली होती. हा सर्व प्रकार समाजमाध्यमांवर प्रसारित होताच दुर्गप्रेमींनी या तरुणाविरोधात कारवाईची मागणी केली होती. मंगळवारी पुरातत्त्व विभागाने दिलेल्या तक्रारीनंतर या तरुणाविरोधात वसई पोलिसांत गुन्हा दाखल झाला. या तरुणाचा शोध घेण्यात येत आहे.

# बनावट परवानगीच्या आधारे अनधिकृत बांधकाम

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** एका नामांकित बांधकाम व्यावसायिकाच्या नावाने असलेली बांधकाम परवानगी (सीसी) वापरून अनधिकृत इमारती बांधल्याचे प्रकरण समोर आले आहे.

मौजे विरार २२६ (पी) भूमापन क्रमांक २३८/५ येथील मंजूर बांधकाम परवानगी क्रमांक वापरून वरद विनायक, व्ही. एन. तसेच १२ अनधिकृत इमारतींचे बांधकाम करण्यात आले होते. या अनधिकृत इमारतींमधील सदनिकांच्या दस्त नोंदणी करून ग्राहक तसेच महापालिकेची फसवणूक केल्याचे उघड झाले होते. याप्रकरणी प्रभाग समिती 'बी' चे प्रभारी साहाय्यक आयुक्त सुरेश पाटील यांनी विरार पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. या तक्रारीनुसार विरार पोलिसांनी व्हीएन डेव्हलपर्सतर्फे नागेंद्र सिंह व जागा मालकांसह विकासक आणि भागीदारांवर कलम ४२०, ४६८, ४७,१,३,४ सह एमआरटीपीतर्गत गुन्हा दाखल केला.

CamScanner

म.टा.पु. पान क्र.1 (7)

# बेकायदा बांधकामे थांबेनात

## वसई-विरार महापालिकेच्या हद्दीत ८,०३४ इमारती अनधिकृत

- पाडकामाची कारवाई सुरू
- मात्र वाढती बांधकामे रोखण्यातील अपयशही उघड

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसई-विरार महापालिका हद्दीत सद्यस्थितीत एकूण आठ हजार ३४ अनधिकृत बांधकामे असल्याचे नुकतेच समोर आले आहे. मागील तीन वर्षांत या अनधिकृत बांधकामांच्या संख्येत ६४३ची नव्याने भर पडली आहे. नवीन अनधिकृत बांधकामांची यादी नुकतीच पालिकेने आपल्या संकेतस्थळावर जाहीर केली आहे. दिवसेंदिवस वाढत जाणारी ही बांधकामे शहरासाठी डोकेदुखी ठरत आहे. एकीकडे पालिकेकडून अनधिकृत बांधकामांवर जोमाने कारवाई सुरू असली, तरी वाढती बांधकामे रोखण्यात पालिका अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे.

वसई-विरार महापालिका हद्दीत झालेल्या अनधिकृत बांधकामांचा मुद्दा उच्च न्यायालयात मागील अडीच वर्षांपासून चर्चेत होता. यावेळी पालिका हद्दीत नऊ हजारांच्या घरात अनधिकृत बांधकामे असल्याचे समोर आले होते. या नऊ हजार १९९ बांधकामांपैकी एकूण सात हजार १६७ बांधकामांवर पालिकेने नोटिसा पाठवण्याची, एमआरटीपीची अथवा इतर प्रकारची कारवाई केली होती. उर्वरित दोन हजार ३२ बांधकामांवर कोणतीही कारवाई न केल्याचे पालिकेने सांगितले होते. याबाबत वसईकरांनी नाराजीही व्यक्त केली होती.

या पार्श्वभूमीवर, पालिकेने अनधिकृत बांधकामांवरील कारवाई जोमाने हाती घेतली होती. तसेच बिट चौक्या आणि अनधिकृत बांधकाम नियंत्रण कक्ष स्थापन करत याद्वारेदेखील कारवाई सुरू केली होती. त्याद्वारे अनधिकृत बांधकामांची संख्या समोर आल्यानंतर, पुढील दीड वर्षांत पालिकेने पालिकेने एक हजार १०८ अनधिकृत बांधकामांवर जेसीबी फिरवला होता. पालिका हद्दीतील नऊ प्रभाग समित्यांच्या हद्दीत कारवाया करण्यात आल्या असून यामध्ये सर्वाधिक कारवाया या विरार येथील 'सी'- चंदनसार या प्रभागात करण्यात आल्या आहेत. त्यापाठोपाठ 'जी'- वालिव या प्रभागाचा क्रमांक लागतो.

यामुळे अनधिकृत बांधकामांची संख्या एक हजार १०८ ने कमी झाली. मात्र आठ हजार ९१ अनधिकृत बांधकामे अजूनही शिल्लक होती. अनधिकृत बांधकामांची जाहीर केलेली आकडेवारी पालिका स्थापनेपासून ते २०२०पर्यंतची आहे. मात्र त्यानंतर मागील तीन वर्षांत एकूण ६४३ अनधिकृत बांधकामांची नव्याने भर पडल्याने अनधिकृत बांधकामांची एकूण संख्या आठ हजार ७३४ झाली. मात्र पालिकेने मागील चार महिन्यांत सुमारे ७०० अनधिकृत बांधकामांवर हातोडा चालवला. त्यामुळे ही संख्या कमी होऊन सद्यस्थितीत शहरात आठ हजार ३४ अनधिकृत बांधकामे शिल्लक आहेत. मागील काही वर्षांत तोडक कारवाई केल्यानंतर, कारवाई न केलेली बांधकामे आणि नवीन बांधकामे मिळून ही आकडेवारी समोर आली आहे. नव्याने होत असलेल्या बांधकामांवर पालिकेने प्राधान्याने लक्ष देऊन त्यांना आळा घालावा, अशी मागणी होत आहे.

प्रातिनिधिक छायाचित्र



> **अनधिकृत बांधकामे नियंत्रित करण्यासाठी बिट चौक्या आणि सीयूसी पथक हे महापालिकेचे महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे अनधिकृत बांधकामे निदर्शनास आल्यास त्यावर कारवाई सुरू आहे. पुढेदेखील ती सुरूच राहणार आहे. पालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामांची यादी याआधी समोर आली होती. संकेतस्थळावर नव्याने झालेल्या अनधिकृत बांधकामांची यादी जाहीर करण्यात आली आहे.**
>
> – **अनिलकुमार पवार**, आयुक्त, वसई-विरार महापालिका

### पालिकेच्या उपाययोजना

अनधिकृत बांधकामांना अंकुश बसावा, यासाठी पालिकेने सुट्टीदिवशीदेखील बांधकामांवर नजर ठेवण्यास सुरुवात केली आहे. पालिका हद्दीत रात्रीच्या वेळी अनधिकृत बांधकामे जोमाने सुरू असल्याचे पालिकेच्या सर्वेक्षणात आढळले होते. त्यामुळे रात्रीच्या वेळीही नजर ठेवत नव्याने सुरू असलेली अनधिकृत बांधकामे तात्काळ जमीनदोस्त करण्यात येत आहेत. त्यानंतर प्रभागात बिट चौक्या स्थापन करून पालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांमार्फत नजर ठेवण्यास सुरुवात करण्यात आली आहे. यासह अनधिकृत बांधकामांवर तोडक कारवाईला वेग यावा, यासाठी नोव्हेंबर २०२२मध्ये अनधिकृत बांधकाम नियंत्रण कक्षाची स्थापनाही करण्यात आल्याचे पालिकेने सांगितले.

### कर्मचाऱ्यांचा आज मोर्चा

**वसई** : वसई-विरार महापालिकेत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कांसाठी अखिल भारतीय कामगार कर्मचारी (भाजप) संघटनेतर्फे आज पालिकेवर मोर्चा काढण्यात येणार आहे. महापालिकेची स्थापना होऊन १३ वर्षे उलटून गेली. परंतु सफाई कामगार, स्मशानभूमी कामगार, व्हॉल्वमन, धूरफवारणी कामगार, महापालिका वैद्यकीय कर्मचारी, बांधकाम विभाग, अतिक्रमण कर्मचारी आदी विविध क्षेत्रांत सेवा देणारे कंत्राटी कर्मचारी अजूनही सुविधांपासून वंचित असल्याचा संघटनेचा आरोप आहे. त्यांना न्याय मिळावा, यासाठी अ. भा. कामगार कर्मचारी (भाजप) संघटनेने आज, गुरुवारी दुपारी ३ वाजता मोर्चाचे आयोजन केले आहे. विरार, फुलपाडा, आरजे हॉटेल ते महापालिका मुख्यालय या मार्गावरून हा मोर्चा निघणार असल्याचे संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय मांडवकर यांनी सांगितले.

CamScanner